# राजनय - Diplomacy – डिप्लोमसी

राजनय म्हणजे काय?

पृथ्वीवरील भूप्रदेशाचे आज जवळपास १९५[1] स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रांमध्ये किंवा राष्ट्रराज्यांमध्ये विभाजन झाले आहे.[2] समान संस्कृती, भाषा, जीवनशैली, आर्थिक स्थिती, भौगोलिक संलग्नता, समान इतिहास या आधारावर माणसे एकत्र येतात आणि राष्ट्रे उभी राहतात.

या सर्व राष्ट्रांचे एकमेकांशी अनेक प्रकारचे संबंध आहेत - चांगले, वाईट दोन्ही स्वरुपाचे - राष्ट्रांतर्गत विविध वस्तुंचा व्यापार चालतो, पर्यटकांची ये-जा चालू असते. क्रीडा आणि सांस्कृतिक स्तरावरील देवाणघेवाण चालू असते. शिक्षण, नोकरी आणि अधिक चांगल्या जीवनाच्या किंवा सुरक्षित जीवनाच्या शोधात माणसांचे स्थलांतर सतत चालू असते. मायदेशी जे सहज मिळत नाही ते दुसऱ्या देशात मिळते का याचा शोध काहीजण घेत राहतात. त्यांच्यामध्ये सीमावाद आहेत, नद्यांच्या पाण्याच्या वाटपाचे प्रश्न आहेत, समुद्राच्या वापराचे प्रश्न आहेत, धार्मिक संघर्ष आहेत, ऐतिहासिक कारणांमुळे निर्माण झालेले संघर्ष आहेत.

या सर्व संबंधांच्या गुंत्यामध्ये प्रत्येक राष्ट्राला आपले राष्ट्रहीत साध्य करायचे असते, राष्ट्राचा विकास करायचा असतो. त्यासाठी ते सर्व घटकांचा विचार करून परराष्ट्र धोरण आखतात. राजनयाच्या माध्यमातून या परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी केली जाते.

राजनयामध्ये चर्चा, वाटाघाटी, तडजोड या बाबींवर भर दिला जातो. यामध्ये जटील प्रश्न सहज सोडविण्याची ताकद आहे.

सध्या युरोपपुढे इराक आणि सिरिया मधून येणाऱ्या निर्वासितांचे संकट उभे आहे. युरोपमधील राष्ट्रांना हे निर्वासीत नको आहेत. काही राष्ट्रांनी आपल्या सीमेवर कुंपण घालून लष्कराचा पहारा वाढवला आहे. तरीही हा लोंढा आवरणे मुश्कील आहे. यावर कायमस्वरुपी उपाय म्हणून युरोपियन युनियनने तुर्कस्तान बरोबर करार केला. या कराराअन्वये तुर्कस्तान निर्वासीतांना आश्रय देणार आहे. युरोपियन युनियन तुर्कस्तानला त्या बदल्यात काही वार्षिक रक्कम देणारा आहे तसेच तुर्कस्तानच्या नागरिकांना युरोपमध्ये व्हीसा शिवाय प्रवेश देण्यात यावा अशी अट तुर्कस्तानने घातली आहे. या संदर्भात दोन्ही बाजूंमध्ये चर्चा आणि वाटाघाटी चालू आहेत. काही गोष्टींवर एकमत झाले आहे, काहींवर अजून व्हायचे आहे. याचा परिणाम म्हणून युरोपमध्ये बेकायदेशीर घुसणाऱ्या निर्वासीतांचा लोंढा कमी झालेला दिसतो. या एकूण प्रक्रियेला राजनयिक प्रक्रिया (Diplomacy) म्हणता येईल.

तुर्कस्तानच्या संदर्भातील आणखीन एक उदाहरण पाहू - २००२ साली तुर्कस्तान मध्ये ए.के.पी. पक्षाचे (Justice and Development Party) सरकार सत्तेवर आले. त्यांचे एकूण धोरण आधीच्या सरकारपेक्षा

---

[1] http://www.nationsonline.org/oneworld/states.htm - राष्ट्रांची यादी.

[2] याशिवाय जवळपास ५० ते ६० छोटे सार्वभौमत्व नसलेले प्रदेश विविध सार्वभौम देशांच्या अधिपत्याखाली अस्तित्वात आहेत. उदाहरणार्थ दिएगो गार्सिया, केयमन बेटे, फॉकलंड बेटे, ग्रीनलँड इत्यादी.

वेगळे होते. आधीच्या सरकारचा भर तुर्कस्तानला युरोपियन युनियन मध्ये समाविष्ट करून घेण्यावर आणि त्याकरीता सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यावर होता. युरोपची याचना केल्यानेच आपला विकास होईल ही त्यांची धारणा होती. नवीन सरकारने हे धोरण मोडीत काढले. त्यांनी युरोपऐवजी जगाच्या इतर भागांवर लक्ष केंद्रीत करण्याचे धोरण स्वीकारले - उदा. आफ्रिका, लॅटीन अमेरिका आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शेजारी मुस्लीम राष्ट्रे - तुर्कस्तान हे मुस्लीम बहुल राष्ट्र आहे परंतु तेथे आधुनिकताही आहे - केमाल पाशा यांच्या क्रांतीमुळे तुर्कस्तानमध्ये प्रचंड बदल झाले. तुर्कस्तानचे एक वेगळे स्थान निर्माण झाले. या वैशिष्ट्यपूर्ण स्थानाचा फायदा घेत मुस्लीम राष्ट्रांचे नेतृत्व करून युरोप आणि मुस्लीम राष्ट्रांमध्ये मध्यस्थाची भूमिका बजावायचे त्यांनी ठरवले.[3] जगभर अनेक नवीन दूतावास उघडले, अनेक देशांशी अनेक नवीन करार केले. २०११ पर्यंत तुर्कस्तानचे उत्पन्न २००२ च्या तुलनेत तिपटीने वाढले. यशस्वी परराष्ट्रधोरणाचे आणि राजनयाचे हे परिणाम होते.[4]

प्रत्येक राष्ट्राचे परराष्ट्र खाते परराष्ट्र धोरण आखण्याचे काम करते. भारताचेही परराष्ट्र खाते आहे.[5] सुषमा स्वराज या सध्याच्या परराष्ट्रमंत्री आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली परराष्ट्र खात्याचे काम चालते. अंतिम नेतृत्व अर्थातच पंतप्रधानांचे असते. परराष्ट्र खात्याची प्रशासकीय व्यवस्था आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्नांची माहिती संकलित करून त्याचे विश्लेषण करून निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मंत्र्यांना मदत करते. प्रशासकीय सेवेतील अधिकारी भारतीय परराष्ट्र सेवेमधून[6] निवडलेले असतात. निवडीनंतर त्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. किमान एखाद्या परकीय भाषेवर प्रभुत्व असणे त्यांच्यासाठी बंधनकारक आहे. चाणक्यपुरी, दिल्ली - या भागात जगातील जवळ जवळ सर्व देशांचे दूतावास आहेत.

भारताने ज्यांना मान्यता दिली आहे अशा प्रत्येक देशामध्ये भारताचे दूतावास - वकिलाती (Embassy) आणि वाणिज्य दूतावास (Consulates) आहेत. राजदूत हे दूतावासाचे प्रमुख असतात. सहसा अनुभवी, निवृत्त प्रशासकीय अधिकाऱ्याची या पदावर नेमणुक केली जाते. मुंबईत गाजलेले पोलीस अधिकारी ज्युलियो रिबेरो[7] हे १९८९ ते १९९३ या काळात निवृत्तीनंतर रोमानिया मध्ये भारताचे राजदूत होते. नुकतेच २०१५ सालात मुंबईचे निवृत्त पोलीस आयुक्त अहमद जावेद[8] यांना सौदी अरेबियामध्ये भारतीय राजदूत म्हणून नियुक्त करण्यात आले. अनेक प्रथितयश व्यक्तींनी जगभर राजदूताचे काम केले आहे.

---

[3] https://www.goodreads.com/book/show/18208469-the-rise-of-turkey - अधिक माहितीसाठी सोनार जगापताय यांचे The Rise of Turkey – The Twenty-first century's first Muslim power हे पुस्तक पहा.

[4] https://www.youtube.com/watch?v=ODk7Yfs0dOw Rise of Turkey या वर उल्लेखिलेल्या पुस्तकासंदर्भातील YouTube video पहा.

[5] http://www.mea.gov.in/ - भारतीय परराष्ट्र खात्याचे संकेतस्थळ

[6] http://www.mea.gov.in/indian-foreign-service.htm Indian Foreign Service (IFS) - भारतीय परराष्ट्र सेवेविषयी अधिक माहिती.

[7] https://en.wikipedia.org/wiki/Julio_Ribeiro_(police_officer) ज्युलियो रिबेरो यांच्याविषयी अधिक माहिती.

[8] Shri Ahmad Javed was appointed as Ambassador of India to Kingdom of Saudi Arabia on 11th December 2015 and took charge w.e.f. AN of 17th February, 2016. - श्री अहमद जावेद यांच्या विषयी अधिक माहितीसाठी खालील संकेत स्थळ पहाः-

http://www.indianembassy.org.sa/Content.aspx?ID=824&PID=681

## दूतावासांचे कार्य

1. व्हीसा देणे - ज्या परकीय नागरिकांना भारतात यायचे आहे त्यांच्या मुलाखती घेऊन गरज लागल्यास चौकशी करून त्यांना योग्य तो परवाना देणे.
2. आपल्या राष्ट्राची प्रतिमा उजळेल अशा कार्यक्रमांचे आयोजन करणे
3. आपल्या राष्ट्राविषयी गैरसमज असतील तर ते दूर करण्याचा प्रयत्न करणे
4. आमजनतेमध्ये सद्भावना वाढीस लागण्यासाठी वाचनालये, कायमस्वरुपी आणि तात्कालिक प्रदर्शनांचे आयोजन करणे - भारतात मुंबई, दिल्ली, कलकत्ता आणि मद्रास अशा काही मोजक्या महानगरांमध्ये अमेरिकेतर्फे अमेरिकन सेंटर चालवले जाते. इथे मोफत वाचनालय, माफक दरात पुस्तके, इंटरनेट इत्यादी इतर सेवा दिल्या जातात. फिल्मस् दाखवल्या जातात, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी कार्यक्रम आयोजित केले जातात. ब्रिटीश लायब्ररी आणि रशियन सेंटर हेच काम त्यांच्या देशासाठी करतात. त्याचप्रमाणे जर्मनीचे मॅक्स्मुल्लर भवन, फ्रान्सची अलायन्स फ्रान्स्वा ही संस्था अनुक्रमे जर्मन आणि फ्रेंच भाषेचे अभ्यासक्रम चालवतात.

## राजनय - व्यापक संकल्पना

राजनय ही खूप व्यापक संकल्पना आहे. तसे पाहिले तर प्रत्येक नागरिक आपल्या देशाचा राजदूत होऊ शकतो. एखादा भारतीय कलाकार अमेरिकेत जातो, आपल्या कलेने तिथल्या लोकांचे मन जिंकतो, त्याच्या प्रभावाने तेथिल चौकस नागरिक भारताला भेट देतात, येथिल काही प्रकल्पांमध्ये गुंतवणुक करतात - भारताचा फायदा होतो, विकास होतो - या सर्व प्रकारात त्या कलाकाराची भूमिका राजनयिक अधिकाऱ्याचीच आहे. फक्त त्याला वैधानिक अधिकार नाही.

स्वामी विवेकानंदांनी जागतिक धर्म परिषदेत प्रभावी भाषण केले. जगभरातल्या लोकांचे भारताबद्दलचे मत चांगले झाले, त्यांच्या मध्ये भारताविषयी आपुलकी निर्माण झाली. विवेकानंदाचा हा राजनयच.

मुंबईमध्ये काही वर्षांपूर्वी स्पेनच्या काही लोकांनी दहीहंडी उत्सव पाहिला त्यांना तो आवडला, त्यांनी गोविंदा पथकांना स्पेन मध्ये आमंत्रण दिले - स्पेन भारत संबंध सुधारण्यामध्ये त्यामुळे मदत झाली.

क्रिकेट डिप्लोमसी - भारत पाकिस्तान संबंध एरवी खूप ताणलेले असतात. दोन्ही संघांदरम्यानच्या क्रिकेट सामन्यांमुळे हा ताण कमी होण्यास मदत होते.

बर्थडे डिप्लोमसी - २५ डिसेंबर २०१५ रोजी इतर राष्ट्रांच्या परदेश वारीवरून परत येताना पंतप्रधान मोदी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना शुभेच्छा देण्यासाठी पाकिस्तानमध्ये उतरले. या सदिच्छा भेटी मुळे चांगले वातावरण निर्माण होऊन संबंध सुधारण्यात मदत होऊ शकते.

मिलीटरी डिप्लोमसी - चर्चा आणि वाटाघाटी हे वास्तविक पाहता लष्कराचे काम नाही. तरीही लष्करी अधिकाऱ्यांचा आणि त्यांच्या कडे असलेल्या सामरिक माहितीचा वापर करून घेण्यावर अलिकडे भर दिला जातो. प्रत्येक राष्ट्राच्या दूतावासात एखादा लष्करी अधिकारीही नेमलेला असतो. लष्करी दृष्टीकोनातून संघर्षाची कारणे शोधून त्यावर वेळी उपाय सुचविण्याचे काम तो करतो. यामुळे संघर्षाचा संभाव्य धोका टळतो.